# नियमीत दिवाणी मुकदमा क्र.३२/२०१७ मधील
# निशाणी क्र.३५ वर आदेश
# CNRNO.MHLA110009822018.

१. सदरचा अर्ज प्रतिवादींनी नि.क्र.२७ वरील विनाम्हणणेचा आदेश बाजूस सारुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जास वादीने म्हणणे दाखल करून विरोध दर्शविलेला आहे.

२. सदर प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकनावरुन स्पष्ट होते की, सदर प्रतिवादींनी नि.क्र.२७ वरील अर्जाला मुदतीमध्ये म्हणणे दाखल केलेले नाही. सदर अर्जाच्या कथनाच्या पृष्ठर्थ सदर प्रतिवादींनी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. सदर नि.क्र.२७ वरील अर्ज वादीने कोर्ट कमिशनरच्या नेमणुकीकरिता दाखल केलेला आहे. त्यामुळे केवळ नैसर्गीक न्यायाचे तत्व विचारात घेवून माझे असे मत झाले आहे की, पक्षकारांमधील वादाचे कायमस्वरुपी निराकरण होण्यासाठी पक्षकारांमधील वाद गुणदोषावर निकाली काढणे आवश्यक आहे. त्याकरिता प्रतिवादींना बचाव मांडण्यासाठी संधी देणे न्यायोचीत होणार आहे. त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब व पक्षकारामधील वादाचे स्वरुप विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, सदरचा अर्ज सदर प्रतिवादींवर खर्च बसवून मंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. नि.क्र.२७ वरील अर्ज प्रतिवादींवर रक्कम रु.३००/- खर्च बसवून मंजूर करण्यात येत आहे.

२. वर नमूद खर्चाची रक्कम प्रतिवादींनी वादीला पुढील तारखेपर्यंत द्यावे अथवा न्यायालयात जमा करावे.

स्वा/-

(शि. म. गौरगोंड)

दि. २२.०३.२०१९. सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, निलंगा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | M.N. Yenge |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D Court (Shivkant M. Gourgond) |
| Date of Judgment/Order | : | 22.03.2019 |
| Judgment/Order signed by presiding officer | : | 22.03.2019 |
| Judgment/Order uploaded on | : | 25.03.2019 |